# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर - ४४० ००१(म.रा.)

जा.क्र.मपविवि/आस्था-४/पदोन्नती/ ३३४७ /२०१६ दिनांक : ०१/१०/२०१६

## आदेश

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर १९९८ मधील कलम १७ (१०) तसेच विद्यापीठ परिनियम २००२ मधील परिनियम १०२ (२) अन्वये मा. कुलगुरु, महोदयांना प्राप्त अधिकारानुसार तसेच विद्यापीठ परिनियम २००२ मधील परिनियम १०० अन्वये गठीत निवड समितीने शिफारस केलेल्या खालील कार्यरत **"लघुलेखक (उच्चश्रेणी)" (वेतन बँड रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु. ४४००)** यांना **"स्वीय सहाय्यक" (वेतन बँड रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन रु. ४६००)** या पदावर नियमित पदोन्नती देण्यात येत असून त्यांच्या नावासमोर रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या कार्यालयामध्ये त्यांची पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | लघुलेखकांचे (उच्चश्रेणी) नांव | सध्या कार्यरत असलेले ठिकाण | पदोन्नतीने नियुक्तीचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आलेले कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | श्री. प्रमोद व्ही. खराबे | महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर | खुला | विद्यापीठ मुख्यालय, नागपूर |
| २. | श्री. एन.बी. धुळे | मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर (सेवावर्ग) (मुळ आस्थापना -पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी ) | खुला | विद्यापीठ मुख्यालय, नागपूर |

१. या आदेशाद्वारे **"लघुलेखक (उच्चश्रेणी)"** यांना **"स्वीय सहाय्यक"** या पदावरील नियमित पदोन्नती त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा, सरकारी निधीची अफरातफर, नैतिक अध:पात वा अन्य स्वरुपाच्या गंभीर आरोपाखाली कार्यवाही चालू नाही तसेच कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित नाही, या धारणेच्या अधीन राहून तसेच खालील अटीच्या अधीन राहुन देण्यात येत आहे.

२. पदोन्नत झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा विद्यापीठ अधिनियम, परिनियम, म.ना.से. नियम, सेवा शर्ती, व विद्यापीठाद्वारे वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या निर्णयांच्या अधीन राहतील.

३. सदरील आदेश तात्काळ अंमलात येतील. या आदेशाद्वारे पदोन्नत झालेल्या वरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना संबंधीत कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुखांनी तात्काळ कार्यमुक्त करुन विद्यापीठास अहवाल सादर करावा. तसेच पदोन्नत अधिकारी / कर्मचाऱ्यांनी वरीलप्रमाणे पदस्थापना केलेल्या कार्यालयात/विभागात तात्काळ रुजू व्हावे.

४. वरील पदोन्नत अधिकारी / कर्मचाऱ्यांनी ही कायमस्वरुपी पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१५/प्र.क्र. ३०३/का.१२ दिनांक १२/९/२०१६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल, याची दक्षता घ्यावी. (यासंदर्भात विद्यापीठ परिपत्रक क्र मपमविवि/आस्था-४/३०६२/२०१६ दिनांक १९/९/२०१६ चे अवलोकन करावे.)

कृमाप ......

५. सदर आदेशाद्वारे वर नमुद अधिकारी / कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली पदोन्नती भविष्यात चुकीची आढळून आल्यास, सदर आदेश रद्द करण्याचे तसेच त्यामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास सदर आदेशामध्ये फेरबदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेले आहेत.

६. वरील अधिकारी / कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीच्या पदावरील त्यांच्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावा, अशाप्रकारचा विकल्प न दिल्यास वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील ११ (१) (ए) खालील तरतुदीनुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेवून केली जाईल.

सदरील आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदर विद्यापीठ आदेश विद्यापीठाच्या mafsu.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

**मा. कुलगुरू महोदय यांचे मंजुरीनुसार.**

**स्वाक्षरीत/-**
**कुलसचिव**
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,**
**नागपूर**

**प्रत माहितीस्तव -**

१. मा. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (पशुविज्ञान शाखा),महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर
२. मा. संचालक, संशोधन,महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर
३. मा. संचालक, विस्तार व प्रशिक्षण, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर
४. मा. अधिष्ठाता, दुग्ध तंत्रज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर
५. मा. अधिष्ठाता, मत्स्य विज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर
६. नियंत्रक (वित्त व लेखा), मपमविवि, नागपूर

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव -**

१. सहयोगी अधिष्ठाता, मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर
२. सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी
३. उपकुलसचिव, आस्थापना विभाग, (आस्था-२)/(आस्था-३)/बिंदुनामावली, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
४. आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
५. आहरण व संवितरण अधिकारी, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी
६. अधिदान व लेखाधिकारी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
७. अधिदान व लेखाधिकारी, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी

प्रत -

१. श्री. प्रमोद व्ही. खराबे, लघुलेखक (उच्चश्रेणी) यांना कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचे मार्फत.
२. श्री. एन.बी. धुळे, लघुलेखक (उच्चश्रेणी) यांना सहयोगी अधिष्ठाता, मत्स्य विज्ञान महाविद्यालय, उदगीर यांचे मार्फत.
३. मा. कुलगुरु महोदय यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
४. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर.
५. वैयक्तिक नस्ती

**उपकुलसचिव**
**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,**
**नागपूर**